## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सायकांळ )

जा.क्र. ५७५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—०९/०९/२०१६

**१) महीलेस जिवाने मारण्याची धमकी दिली . :—**

दिनांक ०७/०९/२०१६ रोजी १६.०० वा. दर. यातील फिर्यादी ही रोडवर सार्वजनीक ठिकाणी आपल्या बक—या चारीत असतांना यातील आरोपी हा तीथे येवुन 'तु आमच्या शेताजवळ येवुन आपल्या बक—या का चारतेस तुझ्या बक—या माझ्या शेतात येतात असे बोलुन तीचे लज्जेस धोका पाहचेल अशा शब्दात बोलुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ५०९,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. टेंभुर्णे पो. स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**२) सार्वजनिक ठिकाणी वाहतुकीस अडथळा निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभे करून मिळून आल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक ०८/०९/०१६ रोजी १६.०० वा. दर. टाटा डीआय गाडी क्र. एमएच ३६ ०२७८ च्या चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन किटाडी फाटा येथे आमरोडवर धोकादायकरित्या वाहन ऊभे करून वाहतुकीस अडथळा निर्माण होईल अशा स्थितीत ऊभे करून मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोहवा. बोरकर पो.स्टे. अडयाळ यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बोरकरे पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

**३) कॅनलचे पाण्यात तोल गेल्याने बुडुन इसमाचा मृत्यु . :—**

दिनांक ०७/०९/२०१६ रोजी १०.३० ते २१.३० वा. दर. यातील मृतक अनिल भिकलाल रिनायत वय ३५ वर्ष रा. दावेझरी हा आपल्या शेतीला कॅनलचे पाणी वागविण्यासाठी कॅनलचे पायरीजवळ गेला असता त्याचे तोल कॅनलचे पाण्यात गेल्याने पाण्यात बुडुन मरण पावल्याने फिर्यादी प्राणहंस भिकलाल रिनायत वय ३५ वर्ष, रा. दावेझरी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. भगत पो. स्टे. आंधळगाव हे करीत आहेत

**४) विहरीचे पाण्यात बुडुन इसमाचा मृत्यु . :—**

दिनांक ०७/०९/२०१६ रोजी १५.०० ते १८.३० वा. दर. यातील मृतक प्रशांत हनुमानसिंग चंदेल वय ३० वष्र, रा. एमएसईबी कॉलोनी भंडारा हा ३ महीण्या अगोदर अपघातामुळे पायाचे ऑपरेशन होवुन पायात रॉड टाकले होते त्यामुळे त्याला चालता येत नसल्याने त्याला खुप त्रास होत होता मृतकचे घरी कोणी हजर नसतांनी त्या त्रासाला कंटाळुन विहरीत उडी मारुन पाण्यात बुडुन मरण पावल्याने फिर्यादी सुनिल चंद्रकुमार पाठक वय ४२ वर्ष रा. एमएसईबी कॉलोनी भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. काटेखाये पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत

(के.एच.धात्रक)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.